**महाराष्ट्र शासन**
**इस्माईल युसुफ कला, विज्ञान व वाणिज्य महाविदयालय,**
**जोगेश्वरी (पूर्व) मुंबई ६०**
दूरध्वनी क्र. ०२२ २८३५२८८१ Email- principaliyc@yahoo.in दूरध्वनी क्र/फॅक्स ०२२-२८२०२१८८

क्र.इयुम/आस्था १/२०२३/ 1010 दिनांक- १४/०६/२०२३.

# सूचना

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. ससं/उशि/मुंवि/परदेशी शिष्यवृत्ती/२०२३/१८०५, दि. १४/०६/२०२३ नुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील **गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती** या योजनेंतर्गत सन २०२३-२४ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत कळविण्यात आलेले आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी सोबत जोडलेल्या पत्रानुसार दि. १४ जून, २०२३ ते १३ जुलै,२०२३ या कालावधीत अर्ज करण्यात यावेत.

प्राचार्य
महाराष्ट्र शासनाचे इस्माईल युसूफ
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,
जोगेश्वरी (पूर्व), मुंबई - ४०० ०६०.

महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई

एलफिन्स्टन तंत्र शिक्षण विद्यालय आवार, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१

Email : jdhemumbai@gmail.com फोन व फॅक्स क्र. ०२२-२२६५६६००


जा.क्र. ससं/उशि/मुंवि/परदेशी शिष्यवृत्ती /२०२३/ 1805 दिनांक :१४.०६.२०२३

**ईमेलद्वारे/तात्काळ कार्यवाहीसाठी**

प्रति,

१. संचालक / प्राचार्य,
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित,
कायम विनाअनुदानित महाविद्यालये, मुंबई विभाग.

२. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.

३. कुलसचिव, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

४. कुलसचिव, महाराष्ट्र विधी विद्यापीठ, मुंबई.

**विषय : उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती " या योजनेंतर्गत सन २०२३-२४ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...**

संदर्भ : उशिसं-२०२३/परदेशी शिष्यवृत्ती योजना/७०४९ दि.१३.०६.२०२३

उपरोक्त संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येत की, दि. ०४/१०/२०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यात आली असून, या योजनेतंर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएच.डी अभ्यासक्रमासाठी THE (Times Higher Education) किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा २० विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

त्याअनुषंगाने सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्याची प्रक्रिया तंत्र शिक्षण संचालनालयाच्या https://dte.maharastra.gov.in या संकेतस्थळावरुन सुरु करण्यात आलेली आहे.

सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत-

- उमेदवार व उमेदवाराचे आई/वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.
- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच प्रवेश घेण्यास इच्छूक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे, अद्ययावत (सन २०२३ मधील) THE (Times Higher Education) किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आत असणे बंधनकारक आहे. उमेदवारांच्या पालकांचे / कुंटुंबाचे व उमेदवार नोकरी करत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (सन २०२२-२३ मधील) एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रुपंये आठ लाखापेक्षा जास्त नसावे.

या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करीता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या https://foreignscholarship२०२२.dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला शासन

निर्णय, क्रमांक.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.०४ ऑक्टोबर, २०१८ व शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/तांशि-४, दि.०६/०९/२०२१ चा शासन निर्णय तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४दि.३०/१०/२०१८ व दि.११/०२/२०१९ ची शासन शुध्दीपत्रक पाहावीत व त्याअनुषंगाने अर्जाची छाननी करण्यात येईल.

सदर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्याकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील "अ" दर्जाच्या वर्तमानपत्रातील सर्व आवर्त्यामध्ये जाहिरातही प्रसिध्द करण्यात येऊन, सदर योजनेंतर्गत पात्र उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी Online पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत.

इच्छुक, उमेदवारांनी https://foreignscholarship२०२२.dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर Online पध्दतीने अर्ज भरलेल्या अर्जाची प्रत, मुळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतीसह पडताळणीसाठी या कार्यालयात दि.१४ जून, २०२३ ते १३ जुलै, २०२३ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) सादर करावयाची आहेत.

सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या स्तरावरुन खालीलप्रमाणे कार्यवाही होण्यासाठी विनंती करण्यात येत आहे.

७. सर्व इलेक्ट्रॉनिक्स माध्यामांच्या वापर करुन या योजनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी.

८. आपल्या महाविद्यालयांच्या/ विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईट, व्टिटर अकाऊंटवरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी.

९. कॅम्पस रेडिओ, महाविद्यालयांच्या /विद्यापीठाचे न्युज लेटर या दृकश्राव्य माध्यमांचा वापर करुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी.

१०. आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या व्हाट्सअप ग्रुप तसेच माजी विद्यार्थी संघटनेच्या व्हाट्सअप ग्रुप वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

११. सर्व समाजमाध्यमांकडून (Social Media) प्रचंड प्रमाणात वापरात येत असलेल्या फेसबुक, इंस्टाग्राम, यु-टयुब, इ. माध्यमांचा सुध्दा वापर करावा.

१२. सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या महाविद्यालयाच्या व विद्यापीठाच्या आधिपत्याखालील सर्व महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

(डॉ. केशव तुपे)
सहसंचालक
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११९५३

क्र.उशिसं-२०२३/परदेशी शिष्यवृत्ती योजना/ /7049 दिनांक-१३/०६/२०२२.

13 JUN 2023

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

**विषयः- उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत सन २०२३-२४ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

**संदर्भः**-१) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक: संकीर्ण-२०१८ /प्र.क्र.२१८/ताशि-४ , दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८.
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/ताशि-४, दि.०६/०९/२०२१.
३) तंत्र शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांकः १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२३/१५३, दि.१२/०६/२०२३.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भाधिन दिनांक ०४ आक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यात आली असून, या योजनेतंर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएच.डी अभ्यासक्रमासाठी THE (Times Higher Education) किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतील अशा २० विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

त्याअनुषंगाने सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्याची प्रकिया तंत्र शिक्षण संचालनालयाच्या https://.dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन सुरु करण्यात आलेली आहे.

सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालील प्रमाणे आहेत.

- उमेदवार व उमेदवाराचे आई/वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.
- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच प्रवेश घेण्यास इच्छूक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे, अद्ययावत (सन २०२३ मधील), THE (Times Higher Education) किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आत असणे बंधनकारक आहे.उमेदवारांच्या पालकांचे/कुटुंबाचे व उमेदवार नोकरी करत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरुन सर्व मार्गानी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (सन २०२२-२३ मधील) एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रुपये आठ लाखापेक्षा जास्त नसावे.
- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करीता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या https://foreignscholarship2023.dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला शासन निर्णय, क्रमांक: संकीर्ण-२०१८ /प्र.क्र.२१८/ताशि-४ , दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८, व शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/ताशि-४, दि.०६/०९/२०२१ चा शासन निर्णय

तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.३०/१०/२०१८ व दि.११/०२/२०१९ ची शासन शुध्दीपत्रके पाहावीत व त्याअनुषंगाने अर्जाची छानणी करण्यात येईल.

सदर शिष्यवृत्तीयोजनेंतर्गत विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्याकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने जाहिरातही प्रसिध्द करण्यात आली आहे.सदर योजनेंतर्गत पात्र उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी Online पध्दतीने अर्ज मागविण्यांत आले आहेत.

इच्छुक, उमेदवारांनी https://foreignscholarship२०२२.dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर Online पध्दतीने अर्ज भरावयाचा असून सदर अर्ज भरण्यासाठीची अंतिम मुदत दिंनाक १२ जुलै २०२३ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) आहे. तसेच Online भरलेल्या अर्जाची प्रत, मुळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालयात दिंनाक १४ जुन, २०२३ ते १३ जुलै,२०२३ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) सादर करावयाची आहेत.

सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या स्तरावरुन खालीलप्रमाणे कार्यवाही होण्यासाठी विनंती करण्यांत येत आहे.

१. सर्व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा वापर करुन या योजनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी.
२. आपल्या विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईट, ट्विटर अकाऊंटवरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी.
३. कॅम्पस रेडिओ, विद्यापीटाचे न्युज लेटर या दृकश्राव्य माध्यमांचा वापर करुन सदर योजनेची माहिती व जाहिरात यास प्रसिध्दी द्यावी.
४. आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या वॉटसअप ग्रुप तसेच माजी विद्यार्थी संघटनेच्या वॉटसअप ग्रुप वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यांत याव्यात.
५. सर्व समाजमाध्यमांकडून (Social Media) प्रचंड प्रमाणत वापरात येत असलेल्या फेसबुक, इन्स्टाग्राम, यु ट्युब, इ. माध्यमांचा सुध्दा वापर करावा.
६. सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या विद्यापीठाच्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालयांना परिपत्रकाव्दारे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत अवगत करण्यांत यावे.

तसेच आपल्या अतंर्गत येणा-या सर्व अकृषि विद्यापीठे,संस्था,शासकीय,अनुदानित ,विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.तसेच सदर योजनेच पोस्टर तयार करुन आपल्या कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात यावे.तसेच आपल्या अधिनस्त सर्व अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये,संस्थानाही सदरचे पोस्टर लावण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.तसेच प्रवेशाच्या कामासाठी प्रत्यक्ष भेट देण्या-या विद्यार्थी व पालकांना याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

(डॉ. प्रकाश बच्छाव)
शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत: १) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांना माहितीस्तव.
२) डॉ. विनोद मोहितकर,प्र. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, ३ , महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, महाराष्ट्र राज्य, मुंबई